जनसंपर्क कक्ष (मुख्यमंत्री सचिवालय)

# मंत्रिमंडळ निर्णय
## दिनांक : २० फेब्रुवारी २०२४
## ( बैठक क्र. ६३ )

| अक्र | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | **राज्य मागासवर्ग आयोगाच्या शिफारशी स्वीकारल्या : मराठा समाजाला १० टक्के आरक्षण** | सामान्य प्रशासन |

२० फेब्रुवारी २०२४

सामान्य प्रशासन विभाग

**राज्य मागासवर्ग आयोगाच्या शिफारशी स्वीकारल्या**

**मराठा समाजाला १० टक्के आरक्षण**

राज्य मागासवर्ग आयोगाच्या शिफारशी स्वीकारुन मराठा समाजाला नोकरी आणि शैक्षणिक प्रवेशासाठी १० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. यानुसार विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनात विधेयक मांडण्यात येईल.

महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाच्या १६ फेब्रुवारी २०२४ च्या अहवालाच्या खंड २ मधील अंतिम शिफारशी पूर्णपणे स्वीकारण्यात आल्या. यामध्ये नागरिकांचा सामाजिक व शैक्षणिक मागासवर्ग Socially and Educationally Backward Class of Citizens हा स्वतंत्र वर्ग निर्माण करून त्यामध्ये सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या मराठा समाजाचा समावेश करण्यात यावा. तसेच सध्याच्या असाधारण स्थिती व अपवादात्मक परिस्थितीत या वर्गाला ५० टक्के मर्यादेच्या बाहेर जाऊन स्वतंत्रपणे आरक्षण देण्यात यावे अशी शिफारस आहे. या अनुषंगाने मराठा समाजाला सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागासवर्गातून- राज्याच्या अखत्यारीतील सेवांमध्ये १० टक्के आरक्षण देण्याचा तसेच शैक्षणिक संस्थांच्या प्रवेशांमध्ये १० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला.

-----०-----